# कोरोग्रस्त जागतीक आर्थव्यसस्था

**Saddamso Hajaratso Pirjade**
Affiliation – Shiv-Shahu Mahavidyalaya,Sarud
University – Shivaji University,Kolhapur
Designation – Assistant Professor , Department of Economics

कोरोना म्हणजे काय ?

*प्रत्यक्षात जर विचार केलाच तर कोरोना नावाच्या विषाणू अशा परीस्थितीशी संबंधीत आहे कि, ज्याच्या संक्रमणामुळे खोकल्यापासून ते श्वास घेण्यापर्यंतचा सामावेश आहे. याची सुरूवात जर आपण पाहिली तर डिसेंबर २०१९ च्या दरम्यान चीन मधील 'वुहान' या शहरात सुरू झाली आणि हळुहळू याचा प्रादुर्भाव जगातील देशात होण्यास सुरूवात झाली. आज जगातील जवळ जवळ १४५ देशामध्ये याचा प्रसार झाला आहे. आणि एका महत्वाच्या गोष्टीकडे लक्ष देणे आवश्यक आहे. ती म्हणजे या कोरोना विषानुवर कोणत्याही प्रकारची प्रतिबंधक लस उपलब्द नाही. या कोरोना व्हायरसलाच (coronavirus disease-COVID-19) असे हि ओळखले जाते. या विषाणूमुळे आजपर्यंत जगभरात ७१०० व्यक्ती मुत्युमुखी पडले आहेत. आणि त्याच लोकांना विषाणूची बाधा झाली आहे. त्यामुळे या विषाणूला रोखणे ही खूप मोठे आव्हान जगातील प्रत्येक देशासमोर उभे राहिले आहे.*

*महत्वाचे शब्द – कोरोना , वायरस , विषाणू, अर्थव्यवस्था , देश,*

## प्रस्तावना –

### कोरोना वायरस आणि जागतीक अर्थव्यवस्था

एकीकडे जगातील अर्थव्यवस्थेची घसरण व दुसरीकडे कोरोना विषाणूची धास्ती आणि या दोन्हींच्या मिश्रणामुळे जे संकट आपल्या सर्वांच्या समोर उभे ठाकले आहे. त्याचा आभ्यास करणे खुपच गरजेचे आहे. कारण प्रत्येक देश विकासाच्या दृष्टीने वाटचाल करीत असताना आशा काही समस्या त्या विकासाच्या मार्गात आडकाठी निर्माण करतात कि,ज्यामुळे ज्या–ज्या देशाच्या मार्गात अशा समस्या निर्माण होतात त्या देशांना काही काळासाठी विकासावरून लक्ष हटवून प्रथम या संकटाचा सामना करण्याकडे लक्ष द्यावे लागते. तशाच पध्दतीने कोरोना नावाच्या नवीन समस्येने प्रत्येक देशाच्या अर्थव्यवस्थेस बाधीत केले आहे. कि, ज्यामुळे प्रत्येक देश यातुन मार्ग काढण्याचा आतोनात प्रयत्न करत आहे. एवढेच नव्हेतर जगातील बलाढय अर्थव्यवस्थांनी आपापल्या देशात आणिबाणी घोषीत केली आहे. इतकी भयावह परीस्थिती या विषाणूमुळे जागतीक अर्थव्यवस्थेसमोर उभी केली आहे. भारतामध्ये आगोदर पासूनच आर्थीक घसरण सुरू होती आणि त्यात भर म्हणजे कोरोना विषाणूने केलेला शिरकाव यामुळे अर्थव्यवस्था कोणत्या पातळीस जाईल हे सांगणे कढीणच आहे. तरीही या विषाणूमुळे भारतीय तसेच जागतीक अर्थव्यवस्थेवर याचे काय–काय परिणाम झाले आहेत. याची सविस्तर चर्चा पुढे केली आहे :–

### कोरोना वायरसमुळे प्रभावित झालेले उद्योग–धंदे

१) पर्यटन व्यवसाय –

उन्हाळयात आणि थंडीच्या दिवसात बरेच लोक बाहेर फिरण्यासाठी पडतात परंतू आजकाल कोरोना वायरसच्या दहशतीने विविध देशातुन पर्यटक आपल्या देशात फिरण्यासाठी येतात. पण ते सोबत कोरोनाचे विषाणूही आणतात. त्यामुळे विविध देशांनी परदेशातून येणाऱ्या पर्यटकावर बंदी घातली आहे. सोबतच बरेच पर्यटक कोरोना वायरसची

लागण होण्याच्या भितीने परदेश दौरे टाळत आहेत. त्यामुळे पर्यटन व्यवसाय संबंधी बरेच लहान—मोठे उद्योग ठप्प झालेले आहेत. त्याचबरोबर बरेच मार्गदर्शक जे पर्यटन व्यवसायाशी संबंधीत आहेत त्यांच्याही रोजगारावर परिणाम झाला आहे. त्याचबरोबर परकिय प्रवाशांचीही कसून तपासणी विमानतळावर केली जात असल्यामुळे बरेच लोक परदेश दौरे टाळत आहेत.

२)शेअर बाजारावरील कोराणाचा परिणाम —

कोरोनाचा प्रादुर्भाव सर्वच श्रेत्रात होत असताना अर्थव्यवस्थेतील महत्वाचा घटक समजला जाणारा शेअर बाजार हा सुध्दा कोरोनाच्या प्रादुर्भावापासून दूर राहू शकलेला नाही. गुंतवणूकदारांच्या मध्ये भितीचे वातावरण पसरल्याने गेल्या अनेक दिवसांपासून शेअर बाजारात मोठी घसरण दिसून येत आहे. सेन्सेक्स आणि निफ्टी मध्येही घसरण पहायला मिळत आहे. २००८ नंतर मुंबई शेअर बाजार सेन्सेक्स आणि निफ्टी पहिल्यांदाच १०% पेक्षा खाली गेला आहे त्यामुळे बऱ्याच दिवसानंतर शेअर बाजारामध्ये लोअर सर्कीट लावले गेले. लोअर सर्कीट म्हणजे शेअर बाजारातील काही काळ व्यवहार बंद ठेवले जातात. कोरोना वायरसमुळे आर्थिक विकासास फटका बसण्याची भिती गुंतवणूकदारांच्या मनात निर्माण होते आणि अशा पध्दतीच्या नैराश्येमुळे शेअर बाजारात घसरण होत चालली आहे.

३) हवाई वाहतुकीवर परिणाम —

कोरोना वायरसच्या प्रभावामुळे त्याचा परिणाम विमान प्रवासावर सुरू झाला आहे. खरतर कोरोना वायरच्या भितीमुळे बऱ्याच देशांनी चीन बरोबर चालू असलेली विमान सेवा स्थगीत केली आहे. कारण विमान प्रवाश्यांच्या बरोबर होणाऱ्या संपर्कामुळे कोरोनाचा प्रभाव वाढेल हे त्याचे मुख्य कारण आहे. त्याचबरोबर परदेशातुन आलेल्या प्रवाशांची पुर्ण तपासणी केल्यानंतरही त्यांना काही दिवस वेगळे राहण्यास सांगण्यात येत आहे. आगोदर पासूनच ज्या—ज्या लोकांनी विमान तिकीट बुकींग केलेले होते त्या लोकांनी कोरोनाच्या भितीमुळे ती विमान तिकीटे रद्द केली आहेत आणि त्याचा परिणाम विमान वाहतुक सेवा पुरवठादार कंपन्यावर होत आहे.

४) पोल्ट्री व्यवसाय —

भारतात सद्या बॉयलर चिकन खाल्याने कोरोनाचा प्रसार वाढतो अशी एक अफवा पसरत आहे. चिकन मुळे कोरोना विषाणूचा प्रादूर्भाव वाढतो अशी बातमी समाजमाध्यमा मध्ये पसरत असल्याने सर्वच लोकांनी याची धास्ती खाल्ली आहे. त्यामुळे सर्वच लोकांनी चिकन खाण्याकडे पाठ फिरविली आहे. याचा परिणाम झाला असा कि,कुक्कुट पालन व्यवसाय ज्यांनी—ज्यांनी सुरू केले होते त्यांना मोठया अडचणींना सामोरे जावे लागत आहे. कारण विषाणूची लागण होण्याच्या भितीने लोक चिकनची खरेदी करत नाहीत. त्यामुळे मागणी कमी व पुरवठा अधिक त्याचबरोबर चिकनचा स्टॉक मोठया प्रमाणात उपलब्द असल्याने चिकन अवघ्या ५० ते ७० रूपयां पर्यत किंमत घसरली आहे. आणि त्यामुळे कुक्कुटपालन व्यवसायिकांना आर्थीक नुकसान सोसावे लागत आहे.

५) विमा व्यवसाय —

पुढचा विचार केल्यास कोरानाच्या प्रादूर्भावाचा परिणाम असा होत आहे कि, कुठे ना कुठे विमाश्रेत्र सुध्दा याच्या विळख्यात सापडले आहे. कोरोनाग्रस्तामध्ये वाढ झाल्यास लोकांचा कोरोनावर इलाज करण्यासाठी दवाखान्याचा खर्च सरकारी विमा आणि खाजगी विमा कंपन्याना करावा लागेल. या रोगामुळे कोणाचा जिव न जाईल तेवढा चांगला जर कोणत्या व्यक्तीचा अनपेक्षीत पणे मृत्यु झाला तर त्या व्यक्तीचा ज्या पध्दतीचा विमा असेल त्या पध्दतीने विमा कंपन्याना त्या व्यक्तीस पैसे द्यावे लागतील. सर्वात महत्वाची म्हणजे या विषाणूमळे मृत्युचे प्रमाण अधिकाधिक वाढत गेल्यास विमा कंपन्यांचे नुकसान होवून बुडण्याची शक्यता आहे.

६) किरकोळ भाजी विक्रेते अडचणीत —

भारतामध्ये सद्या वेगवेळे सण,समारंभ, उत्सव,जत्रा,आठवडी बाजार यावर बंदी घालण्यात आली आहे. त्यामुळे सर्वात महत्वाचे नुकसान झाले

म्हणजे ते आमच्या शेतकरी बांधवाचे. कारण आपल्या शेतात येणारे पिक आठवडी बाजारात विकून आपला उदरनिर्वाह करणारा शेतकरी मोठया आडचणीत आला आहे. कारण जमावबदी त्याचबरोबर गावागावामध्ये कोरोनाच्या भितीपोटी बाजार वगैरे बंद करण्यात आले आहे. त्यामुळे एरवी चक्क खुप गर्दी असणाऱ्या ठिकाणी शुकशुकाट दिसत आहे. त्यामुळे शेतीतील माल खराबा होवू लागला आहे. वस्तूच्या मागणीसाठी बाजारात खरेदीदारांची संख्या कमी असल्याने शेतीतील माल खराब होवू नये म्हणून शेतकरी तो माल कवडीमोल किंमतीत विकत आहेत आणि त्यामुळे अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या शेतकरी वर्गालाही आर्थीक नुकसान सोसावे लागत आहे.

७) <u>मनोरंजन व्यवसायावर परिणाम</u> –

कोरोनाच्या भितीपोटी लोकांच्या जमावास बंदी आणि त्यामुळे बऱ्याच लोकांना कामधंदा मिळेणासा झाला आहे. याचाच एक परिणाम चित्रपट सृष्टीवर होत आहे. आणि तो म्हणजे नवनविन चित्रपट बाजारात आलेत पण थिएटर बंद आणि जर कोठे चालू असेल तर कोरोना वायरसच्या भितीपोटी लोकही सिनेमा पाहण्यासाठी इच्छुक नसल्याचे दिसत आहेत. तस दुसरीकडे लग्न समारंभाच्या तारखा,वेळ असे विविध कार्यक्रम रद्द झाल्याने लग्नाचे हॉल,डॉल्बी तसेच बॅन्ड–बाजा या वांजत्री लोकांना मागणी नसल्याने त्यांची खूप मोठी परवड होत आहे.

८) <u>निर्यातीतील घट</u> –

अनेक देशांनी लोकांना व्हिजा देणे थांबवले आहे. त्याबरोबर आपापल्या देशातील नागरीकांना परदेश दौरे टाळावेत अशा सुचना दिलेने त्याचा खुप मोठा परिणाम आयात–निर्यात व्यापाराव झाला आहे. बऱ्याच देशातील खरेदीदार व व्यापारी यांच्यातील व्यवहार थांबले आहेत. त्याचबरोबर प्रत्येक देश विदेशातुन आलेल्या सर्वच्या सर्व तपासून घेत आहेत त्यामुळेच आयात निर्यात व्यापारालाही खूप वेळ जात आहे.

उदा : भारतात चीन मधून येणारा ए.पी.आय. ( ॲक्टीव्ह फार्मास्युटीकल इनग्रेडीएट्स ) चा पूरवठा बंद झाल्याने तोच ए.पी.आय आता जास्त किंमत मोजून खरेदी करावा लागत आहे. थोडक्यात कोरोनामुळे आयात–निर्यात उद्योगही प्रभावीत झाले आहेत.


९) <u>ॲटो–मोबाईल उद्योग</u> –

ॲटो–मोबाईल श्रेत्राचा विचार करायचा तर भारत अधिपासूनच आर्थीक घसरणीचा सामना करीत आहे. त्यात भर म्हणजे चीन मध्ये कोरोनचा प्रादुर्भाव झाल्याने चीन देश मंदीचा सामना करीत आहे. त्याचा परीणाम असा कि, भारतात येणारा चीनी माल बंदी झाला आहे.

उदा : चीन मधून वस्त्र उद्योगातील मोठी यंत्रे भारतात आयात केली जातात त्याचबरोबर त्यासाठी लागणारे सुटे भागही चीन मधूनच येतात. सद्यातरी आपल्याला एक–दोन महीने पुरतील एवढेच साहित्य उपलब्द आहे. पण चीनमधील परिस्थिती लवकर न सुधारल्यास भविष्यात मोठे संकट आपल्या समोर उभे राहील.

१०) इतर –

वर आपण पाहिलेल्या क्षेत्रापेक्षाही अशा बऱ्याच उद्योग क्षेत्रांना कोरोनामुळे आर्थिक नुकसान सोसावे लागले आहे. त्यामध्ये लघूउद्योगा पासून ते मोठमोठया इंडस्ट्रिज,मॉल, या सर्व ठिकाणाहून गर्दीचे प्रमाण कमी होवू लागले आहे त्यामुळे विक्रीचे प्रमाण कमालीचे घटले आहे.




<u>मुल्यमापन</u> –

वर आपण पाहिलेच कि, डिसेंबर मध्ये सुरू झालेल्या युहान शहारातील कोरोना वायरसने आज संपूर्ण जगास व्यापले आहे. त्याच्या धास्तिने जगातील सर्व लोक भयभीत आहेतच त्यात भर म्हणजे कोरोनाचा प्रादुर्भाव अर्थव्यवस्थानांही होवू लागला आहे. अर्थव्यवस्थेवर त्याचा परिणाम असा होत आहेत कि, अनेक उद्योगांनी आपले उत्पादन थांबवले आहे. कारण त्यांचा माल तसाच पडून आहे. उत्पादन बंद केल्याने त्याचा मोठा फटका रोजगार क्षेत्रास बसत आहे. बऱ्याच लोकांना आपल्या रोजगारापासून हात धूवावा लागत आहे. आजही या रोगावर जगामध्ये कोणत्याही प्रकारची लस उपलब्ध नाही. फक्त काळजी घेण्यापलिकडे आपण काहीच करू शकत नाही.

या परिस्थितीत जर काही बदल घडून नाही आला तर आपणांस लवकरच जागतीक महामंदीला सामोरे जावे लागेल. आणि जर जागतीक अर्थव्यवस्था अशा महामंदीत अडकली तर त्यातुन बाहेर पडणे खुपच अवघड होईल यासाठी प्रत्येक अर्थव्यवस्थेने योग्य ती पावले उचलून आपापली अर्थ व्यवस्था कशी सुधारेल याकडे लक्ष देणे गरजेचे बनले आहे. आणि यानुसार आपण सुध्दा सुरक्षितता बाळगून योग्य ती काळजी घेणे आवश्यक आहे.

<u>संदर्भ</u> –

१) बी.बी.सी न्युज – २३ फेब्रुवारी २०२०
२) न्युज १८ लोकमत– १२ मार्च २०२०
३) रोबोबॅक, मार्कोबॉन्ड .